महाराष्ट्र शासन

तातडीचे.

Email: panchayatraj3@gmail.com

क्रमांक: व्हीपीएम-२०११/प्र.क्र.३६३/पंरा ३
ग्रामविकास व जल संधारण विभाग,
बांधकाम भवन, २५,मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई- ४०००१
दिनांक : २५ जून, २०१४.

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, सर्व

विषय : "राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत राज्यात प्रभावी तंबाखू नियंत्रण करण्यासाठी पंचायती राज संस्थेत समन्वय समित्या संघटीत करण्याबाबत.

संदर्भ : १. सहसंचालक, (असंसर्गजन्यरोग) आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र दिनांक ७/६/२०१४.

२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र दिनांक २९.१०२०१३

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात सहसंचालक, (असंसर्गजन्यरोग) आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र दिनांक ७/६/२०१४ सोबत सुलभ संदर्भासाठी जोडत आहे.

२. उपरोक्त संदर्भातील २ पत्रान्वये सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने तयार केलेल्या राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या मार्गदर्शन पुस्तिकेनुसार (मार्गदर्शन पुस्तिका सोबत जोडली आहे) राज्यात तालुका व गाव पातळीवर पंचायत राज संस्थेत तंबाखू नियंत्रणासाठी व तंबाखूच्या दुष्परिणामाबाबत जन जागृती करण्यासाठी समन्वय समित्या संघटित करण्याबाबत आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई (राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम) यांनी विनंती केली होती.

३. उपरोक्त सूचनेनुसार त्रिस्तरीय पंचायत राज व्यवस्थेतील सर्व कार्यालयांमध्ये संचालक, आरोग्य सेवा संचालनालय (महाराष्ट्र राज्य), मुंबई यांनी सार्वजनिक आरोग्याचा विचार करता राज्यात तंबाखू नियंत्रण प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरिता तंबाखूच्या सेवनामुळे आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामाच्या नियंत्रणासाठी व तंबाखूच्या दुष्परिणामाबाबत जन जागृती करण्यासाठी समन्वय समित्या संघटित करण्याबाबतच्या सुचविलेल्या सूचना व शिफारशीबाबत तसेच तालुका व गाव पातळीवरील समन्वय समित्यांची रचना व कार्य केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक पुस्तिकेत दिल्या प्रमाणे करावी म्हणजेच संदर्भाधिन पत्र १ अन्वये दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने करण्यात यावी व तशा सुचना संबंधित सर्व ग्रामपंचायतींना, पंचायत समित्यांना व जिल्हा परिषदांना आवश्यक त्या सूचना व उचित कार्यवाही करण्याबाबत आपल्यामार्फत सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

(शि.फ.लांडगे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत-वरील प्रमाणे

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१) विभागीय आयुक्त, सर्व विभाग

२) जिल्हाधिकारी (सर्व)

३) सहसंचालक, (असंसर्गजन्यरोग) आरोग्य सेवा, मुंबई आरोग्य सेवा संचालनालय, राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम,आरोग्य भवन, सातवा मजला, सेंट जोर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, मुंबई ४०० ००१, यांचकडे त्यांचे पत्र क्रमांक संआसे/NTCP/नस्ती क्र २२५/ रास./४२८६/२०१४, दिनांक ७/६/२०१४ च्या संदर्भात माहितीसाठी.

४.संचालक ( आरोग्य सेवा, मुंबई) आरोग्य सेवा संचालनालय, राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम,आरोग्य भवन, सातवा मजला, सेंट जोर्जेस रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, मुंबई ४०० ००१, यांना माहितीसाठी.

C:\Users\sharmili sawant\Desktop\sawant\Nilesh Salunke\CR 363.docx

आ.क्र. ५८१/१४/५८१-३ २४/८/१४.

१०९१

# आरोग्य सेवा संचालनालय

## (महाराष्ट्र राज्य)

## राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रम


आरोग्य भवन, ७ वा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई - ०१

| | |
|---|---|
| संचालनालय - २२६२१०३१-३६ | सहसंचालक (असंसर्गजन्य रोग) २२६२२०२७ |
| अनुलक्ष - २२६२०२०२ | सहा.संचालक (असंसर्गजन्य रोग) - २२६२१०४७ |
| आयुक्त (कु.क.) - २२६४००६३/६५ | असंसर्गजन्यरोग कक्ष - २२६२३२२२ |
| Website : http://maha-arogya.gov.in | Emai:stcc.maharashtra@gmail.com |
| Fax No. 022-22620234 (DHS) | Fax No : 022-22642955 (NHM) |


जा.क्र.संआसे/NTCP/नस्ती २२५ क्र./स.सं./ ४२८६ /२०१४
दिनांक : ७/०६/२०१४

प्रति,
मा.प्रधान सचिव,
पंचायतराज व ग्रामविकास विभाग,
मंत्रालय, मुंबई.

(लक्षवेध :- शि.फ.लांडगे, कक्ष अधिकारी, पंचायतराज व ग्रामविकास विभाग मंत्रालय, मंबई)

विषय : राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत राज्यात प्रभावीपणे तंबाखूनियंत्रण करण्यासाठी पंचायतीराज संस्येत समन्वय समित्या संघटीत करण्याबाबत...

संदर्भ : १) राष्ट्रीय तंबाखूनियंत्रण कार्यक्रमाची मार्गदर्शक पुस्तिका
२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.संआसे /NTCP/ नस्ती क्र.२२५/स.स./ २२२६/२०१२, दि २५/१०/१२ चे पत्र.

मा.महोदय,

जगामध्ये दरवर्षी जवळपास ६० दशलक्ष लोकांचा मृत्यु हा तंबाखू सेवनामुळे होत असून तंबाखू सेवन हे जगामधील बरेच आजार आणि मृत्युचे प्रतिबंध करता येण्यासारखे प्रमुख कारण आहे. महाराष्ट्र राज्याचा विचार करता सन २०१० च्या पहाणीनुसार जवळपास ३१.४% लोक तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांचे विविध प्रकारे सेवन करत आहेत. तंबाखू सेवनाचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम पाहता, राज्यात तंबाखू नियंत्रणासाठी आरोग्य विभागातर्फे राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम राबविला जातो.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. २ नुसार या कार्यक्रमाच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक पुस्तिकेनुसार राज्यात तालुका व गावपातळीवर पंचायतराज संस्थेत तंबाखू नियंत्रणासाठी समन्वय समित्या संघटीत करण्याबद्दल आपणांस विनंती करण्यात आली होती.

याबाबतीत आपल्या कार्यालयातील कक्ष अधिकारी यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार, सदर तालुका व गावपातळीवरील समन्वय समित्यांची रचना व कार्य, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक पुस्तिकेत दिल्याप्रमाणे पत्रात खाली नमूद करीत आहेत.

I) तालुकास्तरीय समन्वय समिती :-

तालुका पातळीवर तंबाखूनियंत्रण प्रभावीपणे करण्यासाठी तालुका विकास समितीच्या धरतीवर खालीलप्रमाणे तालुकास्तरीय समन्वय समिती सर्व तालुक्यात स्थापन करावी.

➢ समितीची रचना :-

| | |
|---|---|
| १) गटविकास अधिकारी | - अध्यक्ष |
| २) पंचायत समिती सदस्य | - सदस्य |
| ३) तालुक्यातील सर्व गावांचे सरपंच | - सदस्य |
| ४) तालुकास्तरीय विविध सरकारी कार्यालयांचे प्रतिनिधी उदा.-शिक्षण, आरोग्य, पोलिस, सहकार इत्यादी. | - सदस्य |
| ५) स्वयंसेवी संस्थेचा प्रतिनिधी | - सदस्य |
| ६) तालुका वैद्यकिय अधिकारी | - सदस्य सचिव |

➢ या समितीचे कार्य :-

- तालुक्यामधील तंबाखूनियंत्रण उपक्रमांचे आढावा आणि पर्यवेक्षन करणे.
- पंचायतराज संस्थेतील निर्वाचित सदस्य व अधिकारी यांना तंबाखूच्या दुष्परिणांबाबत माहिती देणे.
- तालुक्यातील सर्व कार्यालये व शैक्षणिक संस्था तंबाखू मुक्त करण्यासाठी प्रयत्न करणे.
- तालुक्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या इतर कार्यक्रमांमध्ये तंबाखूनियंत्रण उपक्रमांचा समावेश करुन जनजागृती करणे.
- तंबाखूनियंत्रण या विषयावर तालुका विकास समितीची वर्षातून दोनदा बैठक बोलावणे.

II) ग्रामस्तरीय समन्वय समिती :-

गावपातळीवर तबाखूनियत्रण प्रभावीपणे करण्यासाठी खालीलप्रमाणे ग्रामस्तरीय समन्वय समिती सर्व गावांत स्थापन करावी. किंवा सदयस्थितीत असणारी आरोग्य व स्वच्छता समितीदेखील तंबाखूनियंत्रण या विषयांवर समन्वय समिती कार्य करु शकते.

➢ समितीची रचना :-

| | |
|---|---|
| १) सरपंच | - अध्यक्ष |
| २) ग्रामपंचायत सदस्य | - सदस्य |
| ३) मुख्याध्यापक/ शिक्षक | - सदस्य |
| ४) अंगणवाडी कर्मचारी | - सदस्य |
| ५) आरोग्य सेवक | - सदस्य |

➢ समितीची कार्ये :-

- गावाला तंबाखूमुक्त करण्याच्या दृष्टीने वार्षिक योजना बनवणे.
- गावातील ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी, महिला बचत गट, तरुणांची संघटना इत्यादी यांमध्ये तंबाखू वापरांच्या दुष्परिणांबाबत जनजागृती करणे.

१०३/-

- विविध राष्ट्रीय किंवा विशेष दिन साजरा करण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांचा समावेश करुन तंबाखू वापरांच्या दूषपरिणांबाबत जनजागृती करणे. उदा. स्वतंत्रता दिवस, प्रजासत्ताक दिवस, जागतिक तंबाखू विरोधी दिवस इत्यादी.
- गावात विविध उपक्रम जसे नाटक, चित्रपट, बोलक्या भावल्यांचे कार्यक्रम इत्यादी राबवून गावकऱ्यांमध्ये तंबाखू वापरांच्या दुष्परिणांबाबत जनजागृती करणे.
- गावकऱ्यांना तंबाखूनियंत्रण कायद्याबद्दल माहिती देणे व तसेच कायद्याच्या उल्लंघनाबाबत सबंधित अधिकाऱ्याकडे तक्रार करणे.
- गावात तंबाखूनियंत्रण या विषयाबाबत काम करण्यासाठी स्वयंसेवक (Volunteers) तयार करणे.
- गावातील सार्वजनिक ठिकाणी सर्वासाठी तंबाखूच्या दुष्परिणांबाबत व तंबाखूनियंत्रणाबाबत विविध मार्गांचा अवलंब करुन माहिती उपलब्ध करुन देणे.
- प्रत्येक महिन्याला या समितीची बैठक होणे अपेक्षित आहे.

तरी सार्वजनिक आरोग्याचा विचार करता, राज्यात तंबाखूनियंत्रण प्रभावीपणे होणे गरजेचे असल्याने राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांच्या मार्गदर्शक पुस्तिकेनुसार पंचायत राज संस्थेंतर्गत सदरील समन्वय समित्या वरीलप्रमाणे संघटीत करण्यात याव्यात, हि विनंती.

सहसंचालक (असंसर्गजन्यरोग)
आरोग्य सेवा मुंबई.